| MHNS080005162012 | दाखल तारीख | : | २४ | ०१ | २०१२ |
|---|---|---|---|---|---|
| | नोंदणी तारीख | : | २४ | ०१ | २०१२ |
| | निकाल तारीख | : | २७ | ०२ | २०२३ |
| | कालावधी | : | वर्ष | महिना | दिवस |
| | | | ११ | ०१ | ०३ |

**अति. मुख्य न्यायदंडाधिकारी, न्यायालय क्र.३, मालेगाव,**
**जिल्हा-नाशिक यांचे न्यायालयात**
( पिठासन अधिकारी :तेजवंत सिंघ अ. संधू)

**नियमित फौजदारी प्रकरण क्रं.७५/२०१२**

**निशाणी क्र.**

सरकार तर्फे मालेगाव कॅम्प पो.स्टे., मालेगाव **...अभियोग पक्ष**

**विरूध्द**

रउफ खान उमर खान, वय ३० वर्षे,
रा. क्रांतीनगर, सोनापुरा झोपडपट्टी, ता.मालेगाव,
जि. नाशिक **...आरोपी**

---

**अभियोग पक्षातर्फे वकिल** :- श्री.जी.जी.पवार
**आरोपींतर्फे वकिल** :- श्री. एस. एस. निकम

---

**:: न्या य नि र्ण य ::**

( दिनांक २७.०२.२०२३ )

आरोपी विरूध्द कलम ३२५, ३२३, ५०४, ५०६ भारतीय दंड विधानाप्रमाणे दोषारोप आहे.

**०२)** अभियोग पक्षाची केस थोडक्यात अशी की, मोहम्मद शरीफ अब्दुल मस्जिद शेख याने दि.२९.०४.२०१० रोजी कॅम्प पो.स्टे. येथे फिर्याद दिली की, तो दिनांक २८.०४.२०१० रोजी तो सोनापुरा मशिदीचे गल्ली मध्ये आला होता. तो सैययद बाबा याचे घरी बसला होता. त्यावेळी त्याची मोटार सायकल क्र.एम.एच.४१ एन. ७४९१ ही गल्लीत पडल्याचा त्यास आवाज आला. तो बाहेर आला तेव्हा एक रिक्षा क्र.एम.एच. ४१ बी. २२१३ यामध्ये बसलेल्या चालकाने रिक्षाची धडक त्याचे मोटर सायकलला मारली होती. त्याबाबत त्याने विचारणा केली असता, त्याने वाईटसाईट

शिवीगाळ करून मोटर सायकल त्याचे घरासमोर का लावली, याचा राग घेवून त्यास मारहाण केली. त्यानेही त्यास धक्का बुक्की केली. तेव्हा त्याने मोठयाने ओरडून त्याचे मित्र लतिफ, अजिज व अययुब यांना बोलावून घेतले. तेव्हा त्या सगळयांनी त्यास लाथा बुक्क्यांनी मारहाण केली. त्यामध्ये त्याचा दात अर्धवट तुटून पडला. त्यास डोळयाचे खाली, पाठीवर तसेच पोटावर मुक्का मार लागला होता. त्यावेळी बरीच गर्दी जमा झाली होती. त्या गर्दीत त्यास समजले की, रिक्षा चालकाचे नाव रउफ खान उमर खान आहे. त्या भांडणात त्याचे खिशातील एल.जी. कंपनीचा मोबाईल तसेच पैसे पडून गहाळ झाले. त्याने मेडीकल तपासणी केली व मेडीकल प्रमाणपत्रासह फिर्याद नोंदविली. त्यानुसार **गुन्हा क्र.२२/२०१०** दाखल झाला. तपासी अंमलदार पो.हवा./०७/ श्री. एस. एस. सुर्यवंशी यांनी घटनास्थळी जावून घटनास्थळाचा तयार केला. साक्षीदारांच्या साक्षी नोंदवल्या व वैद्यकीय प्रमाणपत्र हस्तगत करून आरोपीं विरूध्द दोषारोपपत्र सादर केले.

०३)  आरोपीविरूध्द **निशाणी क्र.११** अन्वये अपराधाचा दोषारोप ठेवण्यात आला. त्यातील मजकूर आरोपीस त्याच्या मातृभाषेत वाचुन दाखवला. आरोपीने दोषारोपातील मजकुर निवेदन **निशाणी क्र.१२** दोषारोप अमान्य केले व प्रकरण चालविण्याची विनंती केली. त्याने खोटी केस असल्याचा बचाव मांडला.

०४)  माझे अवलोकनास उपस्थित मुद्दे व त्यावरील निष्कर्ष खालील प्रमाणे :-

| अ.क्र. | मुद्दे | निष्कर्ष |
|---|---|---|
| १. | **अभियोगपक्षाने असे सिध्द केले काय की, दि.२८.०४. २०१० रोजी रात्री २१.२० वाजता क्रांतीनगर, सोनापुरा मशिदीजवळ, मालेगाव कॅम्प येथे येथे आरोपीने त्यास लाथाबुक्क्यांनी मारहाण करून इच्छापूर्वक जबर दुखापत केली ?** | **नाही.** |
| २. | **अभियोगपक्षाने असे सिध्द केले काय की, दि.२८.०४. २०१० रोजी रात्री २१.२० वाजता क्रांतीनगर, सोनापुरा मशिदीजवळ, मालेगाव कॅम्प येथे येथे आरोपीने त्यास लाथाबुक्क्यांनी मारहाण करून इच्छापूर्वक दुखापत केली ?** | **होय.** |
| ३. | **अभियोगपक्षाने असे सिध्द केले काय की, दि.२८.०४. २०१० रोजी रात्री २१.२० वाजता क्रांतीनगर, सोनापुरा मशिदीजवळ, मालेगाव कॅम्प येथे येथे आरोपीने त्यास उद्देशपूर्व अपमान करून प्रक्षोभित केले, जेणे करून त्याचे हाताने सार्वजनिक शांतेचा भंग व्हावा किंवा त्याचे हातून अपराध घडावा ?** | **नाही.** |

| | | |
|---|---|---|
| ४. | अभियोगपक्षाने असे सिध्द केले काय की, दि.२८.०४. २०१० रोजी रात्री २१.२० वाजता क्रांतीनगर, सोनापुरा मशिदीजवळ, मालेगाव कॅम्प येथे येथे आरोपीने त्यास फौजदारी पात्र धाकदपटशहा केली ? | नाही. |
| ५. | काय आदेश ? | आरोपी यास कलम ३ अपराधी परिविक्षा अधिनियम १९५८ प्रमाणे त्याने सोनपुरा मस्जिद परीसरात २ झाडे लावणे तसेच, उद्यापासून सतत २१ दिवस ५ वेळेचे नमाज अदा करण्याच्या यथोचित समजेवर सोडण्यात आले. |

५)        आरोपीविरूध्दचा गुन्हा शाबीत करण्याकरीता, अभियोग पक्षातर्फे फिर्यादी सह इतर तीन साक्षीदार तपासण्यात आले आहे.

## <u>का र ण मि मां सा</u>

**<u>मुद्दा क्र.१ ते ४ साठी :</u>**

०६)        सदरील प्रकरणातील पुरावा हा मिसळलेला असल्याने सर्व मुद्दे एकत्रितरित्या विचारार्थ घेतले आहे.

०७)        फिर्यादी शरीफ अहमद याने त्याचे फिर्यादप्रमाणे साक्ष दिली. तसेच त्याने फिर्याद **<u>निशाणी क्र.२७</u>** व छापील फिर्याद **<u>निशाणी क्र.२८</u>** सिध्द केले. त्याने न्यायालयात आरोपीस ओळखले. तसेच, त्याचे नाव रउफ खान आहे, अशी साक्ष दिली. त्याचे उलटतपासणीत फिर्याद मधील नमूद तथ्यांनुसार घटना क्रांतीनगर येथे घडली. त्यावेळी फिर्यादी हा सैययद बाबा यांचेकडे  ६ री आला होता आणि त्या ठिकाणी सोनापुरा मस्जिद आहे, असे तथ्ये आणण्यात आले आहेत. या व्यतिरीक्त फिर्यादीस इतर सुचक प्रश्नांद्वारे सदर घटना घडली नाही, आरोपी हा त्याचेपेक्षा उंचीत

लहान आहे, त्यानेच आरोपीस मारहाण केली व खोटी फिर्याद दिली व आरोपीस शिक्षा व्हावी व आरोपीस खेपा माराव्या लागाव्या म्हणून खोटी फिर्याद देवून खोटी साक्ष दिली, असा बचाव मांडण्यात आला.

**०८)** तसेच, सूचक प्रश्नांद्वारे त्याचे साक्षेत असे आणण्यात आले आहे की, सोनापुरा मशीद येथे कॅम्प परिसरातील जास्तीत जास्त लोक नमाजासाठी येतात. त्याआधारे आरोपीचे विधीज्ञ यांनी युक्तिवाद केला की, अभियोग पक्षाद्वारे तपासण्यात आलेले दोन स्वतंत्र साक्षीदार तैययब अली **निशाणी क्र.१५** व शराफत अली **निशाणी क्र.१७** हे दोघे फितूर झाले व फिर्यादीचे साक्षेस पुष्टी दिलेली नाही. मात्र साक्षीदार तैययब अली याचे उलटतपासणीत सरकारी विधीज्ञांद्वारे असे आणण्यात आले आहे की, तो त्याचे घरी मोटर सायकल लावून बसला होता. त्यास रात्रीचे ०९.२० वाजता मोटर सायकल पडल्याचा आवाज आला होता. आवाज आल्याने तो बाहेर आला. आरोपी याचे रिक्षेने धक्का लागल्याने मोटरसायकल पडली होती. पुढे त्याचे साक्षेत त्याने कबूल केले आहे की, त्याचे आरोपीसोबत चांगले संबंध आहेत. आरोपीस कोणतीही शिक्षा होवू नये, कोणताही त्रास होवू नये, अशी त्याची इच्छा आहे. तसेच, साक्षीदार शराफत अली याचे उलटतपासणीत सरकारी विधीज्ञाद्वारे असे आणण्यात आले आहे की, आरोपी त्याचे घराचे बाजूस राहतो, त्याचे आरोपीसोबत चांगले संबंध आहेत. आरोपीस कोणतीही शिक्षा होवू नये, कोणताही त्रास होवू नये, अशी त्याची इच्छा आहे. सदर दोन्ही साक्षीदारांची उलटतपासणी आरोपीतर्फे घेण्यात आलेली नाही.

**०९)** साक्षीदार मन्साराम **निशाणी क्र.४२** हा घटनास्थळ पंच असून त्याने त्याचे समक्ष पंचनामा झाला नाही, असे जरी कबूल केले तरी त्याने पंचनामावरील त्याचे सही असल्याचे मान्य केले.

**१०)** फिर्यादीचे साक्षेत त्याने आरोपीने त्यास लाथाबुक्क्यांनी मारहाण केल्याने त्याचे अर्धवट दात पडले होते, असे जरी सांगितले आहे, मात्र सदर प्रकरणात सदर अर्धवट दात जप्त होता किंवा नाही, हे सिध्द झालेले नाही. **निशाणी क्र.१** चे अवलोकन केले असता, अर्धवट दात जप्त करण्यात आलेला नाही, असे स्पष्ट होते. तसेच, गंभीर दुखापत सिध्द करणेसाठी अभियोग पक्षाद्वारे वैद्यकिय अधिकारी यांना तपासण्यात आले नाही व वैद्यकिय प्रमाणपत्र सिध्द करण्यात आलेले नाही. तसेच, फिर्यादी याचे साक्षेत आरोपीने त्यास उद्देशपूर्व अपमान करून प्रक्षोभित केले, जेणे करून त्याचे हाताने सार्वजनिक शांतेचा भंग व्हावा किंवा त्याचे हातून अपराध घडावा किंवा आरोपीने त्यास फौजदारी पात्र धाकदपटशहा केली, असे स्पष्टपणे सांगितलेले नाही.

**११)** महत्त्वाचे म्हणजे आरोपीचे कलम ३१३ फौजदार व्यवहार संहितेप्रमाणे नोंदविलेल्या

जबाबात त्याने स्पष्टपणे कबूल केले आहे की, त्याचे गाडीने फिर्यादीचे गाडीस धक्का लागला होता. हिच बाब फिर्याद **निशाणी क्र.२७ व २८** व फिर्यादीचे साक्षप्रमाणे सदर घटना घडण्यास कारण आहे.

**१२)** एकंदरीत वरील सर्व पुराव्यांचा बारकाईने अवलोकन केले असता फिर्यादी शरीफ याचे साक्षमध्ये व फिर्याद **निशाणी क्र.२७ व २८** वर नमूद तथ्य की, आरोपीने त्यास दात तोडून गंभीर दुखापत केली किंवा त्यास उद्देशपूर्व अपमान करून प्रक्षोभित केले, जेणे करून त्याचे हाताने सार्वजनिक शांतेचा भंग व्हावा किंवा त्याचे हातून अपराध घडावा किंवा आरोपीने त्यास फौजदारी पात्र धाकदपटशहा केली हि बाब स्पष्ट साक्षेअभावी सिध्द होत नाही.

**१३)** मात्र आरोपीने नमूद घटनेचे दिवशी नमूद घटनास्थळी त्यास लाथाबुक्क्यांनी मारहाण करून इच्छापूर्वक दुखापत केली, हि बाब फिर्यादीचे तसेच, दोन्ही साक्षीदार तैययब अली **निशाणी क्र.१५** व शराफत अली **निशाणी क्र.१७** याचे उलटतपासणीत सिध्द होते. तरी, मी मुद्दा क्र.१, ३ व ४ यांना नकारार्थी उत्तर नोंदवित आहे व मुद्दा क्र.२ यास होकारार्थी उत्तर नोंदवित आहे.

**मुद्दा क्र.५ साठी**

**१४)** मुद्दा क्र.१, ३ व ४ यांना नकारार्थी उत्तर नोंदविल्याने आरोपी हा कलम ३२५, ५०४ व ५०६ भारतीय दंड विधान या कलमातून दोषमुक्त होणेस पात्र ठरतो.

**१५)** मुद्दा क्र.२ यास नकारार्थी उत्तर नोंदविल्याने आरोपी हा भारतीय दंड विधान कलम ३२३ नुसार शिक्षेस पात्र ठरतो. तरी त्यास शिक्षेबाबत विचारणा करण्यास मी या ठिकाणी थांबत आहे.

**मालेगांव.**
**दिनांक : २७.०२.२०२३.**

**( तेजवंत सिंघ अं. संधू )**
**३रे अति. मुख्य न्यायदंडाधिकारी,**
**मालेगांव.**

**१६)** आरोपीस शिक्षेबाबत विचारले असता त्याने सांगितले की, तो एक गरीब व्यक्ती आहे. त्याचेवर घरच्यांची जबाबदारी आहे. तरी त्यास कमीत कमी शिक्षा करण्याची विनंती त्याने केली. सरकार पक्षातर्फे सरकारी विधीज्ञ श्री.पवार यांनी जास्तीत जास्त शिक्षा करण्याची विनंती केली.

**१७)** प्रकरणात हे लक्षात घेणे आवश्यक आहे की, फिर्यादी **निशाणी क्र.२७** व फिर्यादी याचे साक्षप्रमाणे त्याने सुध्दा आरोपीस धक्काबुक्की केली होती. तरी, पंरतू त्याचे विरूध्द कोणताही गुन्हा दाखल नाही. तसेच, फिर्याद मध्ये इतरही आरोपीचे मित्रांनी त्यास मारहाण केली होती. मात्र त्यांना प्रकरणात आरोपी म्हणून समाविष्ट केले गेलेले नाही. तसेच, कलम ३२३ भारतीय

दंड विधान यातील अपराध सिध्दीला एक वर्ष पर्यंत वाढविता येईल, इतके कारावास किंवा १ हजार रूपयांपर्यंत द्रव्य दंडाची किंवा दोन्ही शिक्षा देता येतात. त्यानुसार सदर प्रकरण हा अपराधी परिवीक्षा अधिनियम, १९५८ च्या कलम ३ मध्ये पूर्णपणे बसतो. सदर कलम ३ नुसार विवक्षित अपराधी यास **यथोचित समज** देवून सोडून देण्याचे अधिकार न्यायालयास प्राप्त आहेत. **यथोचित समज** म्हणजे आरोपीने केलेला गुन्हा हा सिध्द झालेने त्याने अशाच प्रकारे पुन्हा गुन्हा करू नये, याबाबत त्यास यथोचित समज देणे गरजेचे आहे. माझे मते यथोचित समज देणे म्हणजे आरोपीस त्याने गुन्हा केला होता, तो सिध्द झाला होता व त्याने त्याच प्रकारे गुन्हा पुन्हा करू नये, यासाठी त्यास हया बाबी आठवणीत राहणे गरजेचे आहे. तरी, सदर आरोपीने सदर गुन्हा सोनापुरा मस्जिद जवळ केला असल्याने त्या मस्जिद च्या उपलब्ध असलेल्या जागेवर दोन झाडे लावावीत व त्यांचा संगोपन करावा, हा आदेश यथोचित समजमध्ये पुर्णपणे बसेल. तसेच, सदर आरोपी हा मुस्लिम धर्मिय असून त्यास ५ वेळा नमाज अदा करणे बंधनकारक असतांना तशी नमाज तो वेळेअभावी करत नाही, असे त्याने मान्य केले आहे. तरी त्याने पाच वेळेचे नमाज फजर, जोहर, असर, मगरीब आणि ईशा उद्यापासून २१ दिवस सतत अदा करावी या अटीवर सोडणे योग्य होईल.

**१८)** सदर आदेशाची अंमलबजावणी होणे, हे सुध्दा गरजेचे असल्यामुळे अपराधी परिविक्षा अधिनियम, १९५८ तील न्यायालयास कलम १३-१-ग प्राप्त अधिकारानुसार मालेगाव शहरात असलेले कृषी अधिकारी यांना विशेष परिविक्षा अधिकारी म्हणून नेमणूक करणे व सदर आदेशाची बजावणी करून घेणे, हे क्रम प्राप्त आहे. तरी, मी मुद्दा क्र.५ साठी खालीलप्रमाणे आदेश पारीत करीत आहे :-

## :: <u>आ दे श</u> ::

**(१)** आरोपीस फौजदारी प्रक्रिया संहिता कलम २४८(१) नुसार भारतीय दंड विधान कलम ३२५, ५०४ व ५०६ अन्वयेच्या गुन्हयातून दोषमुक्त करण्यात येत आहे.

**(२)** आरोपीस फौजदारी प्रक्रिया संहिता कलम २४८(२) नुसार भारतीय दंड विधान कलम ३२३ हया गुन्हयात दोषी ठरविण्यात येते.

**(३)** आरोपीस अपराधी परिविक्षा अधिनियम १९५८ च्या कलम ३ नुसार तो सोनापुरा मस्जिद, मालेगाव कॅम्पच्या उपलब्ध असलेल्या जागेवर दोन झाडे लावेल व त्यांचा संगोपन करेल आणि त्याने पाच वेळेचे नमाज फजर, जोहर, असर, मगरीब आणि ईशा उद्यापासून २१ दिवस सतत नमाज अदा करावी अशी यथोचित समज देवून त्यास सोडण्यात येते.

(४) अपराधी परिविक्षा अधिनियम, १९५८ चे कलम १३-१-ग च्या तरतुदींनुसार कृषी अधिकारी, मालेगाव यांना विशेष परिविक्षा अधिकारी म्हणून नेमणूक करण्यात येते व त्यांना सदर आदेशाची बजावणी करून तसा अहवाल देण्यास आदेशित करण्यात येते.

(५) कृषी अधिकारी, मालेगाव यांना गरज भासल्यास सदर आदेशाची अंमलबजावणी करण्यास पोलीस स्टेशन कॅम्प येथील आवश्यक पोलीस बलाचा वापर करण्याची मुभा देण्यात येते.

(६) सदर न्यायनिर्णयाची संपूर्ण प्रत विशेष पत्रासह कृषी अधिकारी, मालेगाव तसेच, सोनापुरा मालेगाव मस्जिदीचे इमाम यांना सदर निकालाची प्रत कार्यालयामार्फत तात्काळ पाठविण्यात यावी.

**मालेगांव.**
**दिनांक : २७.०२.२०२३.**

**( तेजवंत सिंघ अं. संधू )**
**३रे अति. मुख्य न्यायदंडाधिकारी,**
**मालेगांव.**